सकाळ
पुणे, रविवार
७ जानेवारी २०१८

# कॅमेऱ्यासोबतच दृष्टी, प्रामाणिकताही हवी

## गणेश शंकर यांचे मत; 'वसुंधरा'तील छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन

पुणे, ता. ६ : "मी गेल्या २४ वर्षांपासून छायाचित्रण करतोय. प्रत्येक वर्षी त्यात काही ना काही बदल होत राहतात. आधुनिक कॅमेरा आणि लेन्स असणाऱ्या छायाचित्रकाराला उत्तम छायाचित्रण येते असा लोकांचा समज झाला आहे. त्यात तथ्यही आहे; पण तंत्रज्ञानासोबत छायाचित्रणासाठी लागणारी दृष्टी आणि प्रामाणिकपणाही हवा असतो. हे गुण आत्मसात केले की छायाचित्रणाचे जग खऱ्या अर्थाने गवसते,'' असे मत वन्यजीव छायाचित्रकार गणेश शंकर यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

'किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लब' आणि विविध संस्थांनी आयोजित केलेल्या '१२ व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'तील छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन शंकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी 'नेचर फोटोग्राफी - द जर्नी सो फार' या विषयावर ते बोलत होते. महोत्सवाचे अध्यक्ष माधव चंद्रचूड, संयोजक वीरेंद्र चित्राव आदी या प्रसंगी उपस्थित होते. या वेळी शंकर यांनी निसर्ग छायाचित्रणाबद्दल दृकश्राव्य पद्धतीने माहिती देत आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. प्रदर्शनात घेतलेल्या छायाचित्र स्पर्धेतील विजेत्या छायाचित्रकारांना गौरविण्यात आले. शशांक गांधी, मंदार घुमरे आणि डॉ. आनंद बोरा यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळाले. वन्यजीव छायाचित्रणातील विविध पैलू छायाचित्रांच्या माध्यमातून पाहायला मिळणार आहेत. २१ विशेष विभागांमध्ये देशभरातील अनेक छायाचित्रकारांनी काढलेली वैविध्यपूर्ण चित्रे येथे पाहता येतील. पक्ष्यांचे जग, कीटकांची अजबगजब दुनिया, प्राण्यांचे विश्व यासह निसर्गातील विविधता रसिकांना प्रदर्शनातील छायाचित्रांतून पाहता येईल. शंकर यांनी काढलेली विविधांगी छायाचित्रेही प्रदर्शनात आहेत. त्याशिवाय पर्यावरण आणि विविध ज्वलंत विषयांवर भाष्य करणारी छायाचित्रेही येथे मांडण्यात आली आहेत. शंकर म्हणाले, "निसर्ग छायाचित्रण ही एक कला आहे; मात्र आपण त्यात नवीन काय करतो हे महत्त्वाचे आहे. या कलेद्वारे भावना व्यक्त करता यायला हव्यात. क्षण टिपण्यासह त्यातील वैविध्यही महत्त्वाचे ठरते. सध्याच्या युगात अनेकांकडे डिजिटल कॅमेरा, मोबाईल फोन आहेत. असे असले तरी त्यासाठीची दृष्टी असायला हवी. गेल्या वर्षभरात जगात तब्बल ३२० कोटी छायाचित्रे घेतली गेली. त्यात तुमचे छायाचित्र नावीन्यपूर्ण असेल तरच ते लक्षात राहते. आपण छायाचित्रणातील नावीन्यपूर्ण गोष्टी स्वीकारून त्यावर चर्चा करायला हवी.'' गो वाइल्ड आणि बीएनसीए महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित हे प्रदर्शन सोमवारपर्यंत (ता. ८) बालगंधर्व कलादालनात पाहावयास खुले राहील.



बालगंधर्व कलादालन : बाराव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आयोजिलेल्या प्रदर्शनातील छायाचित्रे पाहताना नागरिक.

### लेन्सेसवर अधिक खर्च

**लहानपणापासूनच मला निसर्ग छायाचित्रणाची ओढ लागली. मी साध्या कॅमेऱ्याद्वारे छायाचित्रणाला सुरवात केली; पण कालांतराने माझ्याकडे आधुनिक कॅमेरा आणि लेन्स आल्या; मात्र यावर माझी बायको म्हणते, ''मी कपड्यांवर कमी आणि लेन्सेसवर अधिक खर्च करतो.'' शंकर यांचे हे बोलणे ऐकताच सभागृह हास्यकल्लोळात बुडाले.**